श्री रामचंद्र अभिमन्यू शिंदे, सेवानिवृत्त ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत साकत सावरगाव,ता.जामखेड यांचे सेवानिलंबन कालावधीचे निर्णयाबाबत.

जिल्हा परिषद अहिल्यानगर
ग्रामपंचायत विभाग
आदेश क्र.साप्रवि-२/ग्रापं-३/१७२/२०२६
दिनांक - स्वाक्षरी खाली नमूद केलेप्रमाणे

संदर्भ - १.या कार्यालयाचे आदेश क्र.साप्रवि-२/ग्रापं-३/५८५/२०१४, दिनांक १९/०८/२०१४.
२.या कार्यालयाचे पुन:स्थापित आदेश क्र.साप्रवि-२/ग्रापं-३/१५९/२०१५,दि.१६/०२/२०१५.
३.सहायक आयुक्त (चौकशी) नाशिक विभाग,नाशिक यांचेकडील चौकशी अहवाल क्र. विशा/खाचौ/सी.आर.१९७/२०१४, दिनांक ३१/०८/२०१५.
४.गटविकास अधिकारी पंचायत समिती जामखेड यांचेकडील पत्र क्र.वशि/आस्था-२/१०५४/२०१२, दि.२४/११/२०२२.
५.या कार्यालयाचे आदेश क्र. साप्रवि-२/ग्रापं-३/२३१/२०२३, दिनांक २३/०३/२०२३.
६. गटविकास अधिकारी पंचायत समिती जामखेड यांचेकडील पत्र क्र.वशि/आस्था-१/१४१७/२०२३, दि.२६/०९/२०२३.
७.या कार्यालयाची सेवा निलंबन नोटीस क्र.साप्रवि-२/ग्रापं-३/९०/२०२४,दि.०८/०२/२०२४.
८.श्री रामचंद्र अभिमन्यू शिंदे, सेवानिवृत्त ग्रामविकास अधिकारी यांचा खुलासा दि.०४/०५/२६

श्री रामचंद्र अभिमन्यू शिंदे, सेवानिवृत्त ग्रामविकास अधिकारी, हे ग्रामपंचायत- साकत सावरगाव, ता. जामखेड येथे कार्यरत असतांना केलेल्या गैरवर्तनामुळे संदर्भ क्र.१ चे आदेशान्वये त्यांना आदेशाच्या दिनांकापासून सेवा निलंबित करणेत आलेले होते. संदर्भ क्र. २ चे आदेशान्वये; पंचायत समिती कर्जत येथे पुनःस्थापनेने पदस्थापना दिलेली होती. त्यानुसार, श्री. शिंदे हे दिनांक १३/०३/२०१५ रोजी पंचायत समिती कर्जत येथे हजर झालेले आहेत.

संदर्भ क्र. ५ अन्वये, श्री रामचंद्र अभिमन्यू शिंदे, सेवानिवृत्त ग्रामविकास अधिकारी, यांना कामकाजात केलेल्या गैरवर्तनाबाबत संदर्भ क्र.३ च्या अहवालानुसार चौकशी अधिकारी यांच्यासमोर आलेली कागदपत्रे, साक्षीपुरावे व अपचारी यावरुन सर्व बाबींचा विचार करुन आरोप सिध्द होत नाहीत, म्हणुन श्री शिंदे आर.ए., सेवानिवृत्त ग्रामविकास अधिकारी यांना दोषमुक्त केले आहे.

श्री रामचंद्र अभिमन्यू शिंदे, सेवानिवृत्त ग्रामविकास अधिकारी, यांचा दिनांक १९/०८/२०१४ ते दिनांक १२/०३/२०१५ या सेवा निलंबन कालावधीचा निर्णय घेणेची बाब विचाराधिन होती. त्या अनुषंगाने या कार्यालयाचे संदर्भ क्र. ७ चे नोटीसीमध्ये त्यांचा उक्त सेवा निलंबन कालावधी सर्व कारणांसाठी सेवा निलंबन कालावधी म्हणून का समजण्यात येऊ नये?, या बाबतचा खुलासा सदर नोटीस मिळालेपासून साठ दिवसांचे आत करणेबाबत फर्माविण्यात आले होते. उक्त नोटीस श्री रामचंद्र अभिमन्यू शिंदे, सेवानिवृत्त ग्रामविकास अधिकारी, यांनी संदर्भ क्र.८ अन्वये खुलासा सादर केला असुन संदर्भ क्र.५ च्या आदेशानुसार त्यांना दोषमुक्त केले असल्याने सेवा निलंबन कालावधी हा सेवेच्या सर्व कामांसाठी व्यतित केलेला कालावधी धरणेबाबत विनंती केलेली आहे.

श्री रामचंद्र अभिमन्यू शिंदे, सेवानिवृत्त ग्रामविकास अधिकारी यांचा खुलासा मान्य/~~अमान्य~~ करण्यात येवून, महाराष्ट्र नागरी सेवा सेवा (पदग्रहण अवधी स्वियेत्त सेवा निलंबन व बडतर्फ यांचे काळांतील प्रदाने) नियम १९८१ चा नियम ७२ चे (२) (ब) मधील तरतूदीनुसार निम्न स्वाक्षरीत नियुक्ती प्राधिकरणास प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन मी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर, श्री रामचंद्र अभिमन्यू शिंदे, सेवानिवृत्त ग्रामविकास अधिकारी यांचा दिनांक १९/०८/२०१४ ते दिनांक १२/०३/२०१५ हा सेवा निलंबन कालावधी सेवेच्या सर्व कारणांसाठी कर्तव्य कालावधी धरण्यात यावा; असे आदेश देत आहे.

सदर आदेशाची नोंद श्री रामचंद्र अभिमन्यू शिंदे, सेवानिवृत्त ग्रामविकास अधिकारी यांचे मुळ सेवा पुस्तकात घेणेत यावी.

सदरचा आदेश जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०७२९०६०९७० असा आहे.

Digitally signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 29-07-2026 16:32:24

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

१. श्री रामचंद्र अभिमन्यू शिंदे, सेवानिवृत्त ग्रामविकास अधिकारी,जामखेड
व्दारा व प्रत: -गटविकास अधिकारी, पंचायत समिती जामखेड.

२. गटविकास अधिकारी, पंचायत समिती जामखेड.

२/- सोबतचा आदेश श्री रामचंद्र अभिमन्यू शिंदे, सेवानिवृत्त ग्रामविकास अधिकारी यांना बजावून तो मिळालेबाबत दुय्यम प्रतीवर त्यांची तारखेसह स्वाक्षरी घेऊन पोहोच या कार्यालयास सादर करावी.

३. कार्यासन-आस्थापना-ग्रामपंचायत -१,ग्रामपंचायत विभाग,जि.प.अहिल्यानगर.

४. निवड नस्ती.